# प्रकरण पहिले

# महात्मा गांधी यांचे फाळणीसंबंधी विचार

# प्रकरण 9

# महात्मा गांधी यांचे फाळणीसंबंधीचे विचार

भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. या देशाला स्वातंत्र्य मिळाले ते केवळ महात्मा गांधींच्या नेतृत्त्वामुळेच, ही वस्तुस्थिती आता साऱ्या दुनियेने मान्य केली आहे. गांधींनी देशाच्या स्वातंत्र्य लढयाचे सलग तीस वर्षे नेतृत्त्व केले. इंग्रजांनी आपल्या मानेवर पारतंत्र्याचे जू लादले होते ते झुगारुन देऊन आपण स्वतःच आपल्या भवितव्याचे शिल्पकार बनू शकतो अशी जाणीव समाजामधील प्रत्येक घटकात त्यामध्ये स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब, स्पृश्य-अस्पृश्य असतील यांच्यात स्वातंत्र्याची प्रखर भावना सर्वप्रथम जागविण्याचे कार्य अन्य कोणा व्यक्तिपेक्षा, संघटनेपेक्षा महात्मा गांधींनीच प्रामुख्याने केले.

अर्थात देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात प्रामुख्याने महात्मा गांधींची कामगिरी महत्त्वाची ठरते. भारताच्या स्वातंत्र्य फाळणीच्या कडू आठवणीने मिळाले. या फाळणीसाठी गांधींना जबाबदार धरता येणार नाही. जातीय निकषावर देशाचे दोन तुकडे होऊन नयेत म्हणून गांधींनी अगदी अखेरच्या क्षणापर्यंत फाळणीला विरोध केला. पंजाब आणि बंगालच्या विभाजनालासुध्दा त्यांच्या सक्त विरोध होता. फाळणीच्या तत्त्वाला गांधींचा सुरुवातीपासून विरोध होता. फाळणी ही हिंदू-मुस्लिम या दोन धर्माच्या द्वेषामुळे होते आहे असा समज सर्व हिंदू-मुस्लिम लोकांमध्ये होता. गांधींच्या मते, धर्म ही एक बदलता येण्यासारखी गोष्ट आहे. राष्ट्रकल्पनेमध्ये तिचे अधिष्ठान असून शकत नाही. हिंदू-मुस्लिम हे परस्पर विरोधी संस्कृतीचे धर्म नाहीत. मुसलमानामधील बहुसंख्य लोक धर्मांतरीत हिंदू किंवा त्यांचे वंशज आहेत. धर्म जरी बदलला तरी माणसाची संस्कृती बदलत नाही.

धर्म ही प्रत्येकाची खाजगी बाब आहे. धर्माची मर्यादा ईश्वर व भक्त यांच्यातील संबंधापुरती मर्यादित राहिली पाहिजे. धर्माच्या कारणास्तव माणसा-

माणसांमध्ये मतभेद करणे चुकीचे आहे. हिंदू-मुस्लिम यांचे आर्थिक प्रश्न एकसारखे आहेत. त्यांच्यामध्ये मतभेद आहेत ते धार्मिक बाबतीत, तसेच त्यांच्या धर्माच्या कायद्यामध्ये व धर्माच्या चालीरिती याबाबतीत मतभेद आहे. म्हणून हिंदू-मुस्लिम अशी दोन राष्ट्रे निर्माण करणे हे सत्याला विसंगत आहे अशी गांधींची भूमिका होती.(१)

पाकिस्तानची मागणी पुढे येऊ लागल्यावर देशाची फाळणी करण्यापूर्वी माझ्या देहाचे विच्छेदन करा. "देशाच्या फाळणीत मी राजेखुषीने सहभागी होऊ शकणार नाही ते टाळण्यासाठी मी सर्व अहिसंक उपायक योजीन"(२) असे त्यांनी जाहीर केले. ब्रिटीशांनी कोणत्याही स्वरुपात भारताची फाळणी करता कामा नये. यादृष्टिने गांधीजींनी अगदी अखेरपर्यंत संबंधीत प्रस्तावास कडाडून विरोध केला. सत्ता ताब्यात देण्यापूर्वी ब्रिटीशांनी भारताची धार्मिक तत्त्वावर फाळणी केली तर कटुता व ध्येय वाढीस लागून अराजक माजेल, देश उध्वस्त होईल असा इशारा गांधीजींनी दिला.(३)

शेवटचे व्हाईसरॉय माऊंटबॅटन यांचे मार्च १९४७ रोजी दिल्लीत आगमन झाल्यानंतर अवघ्या पंधरा दिवसातच गांधीजींनी त्यांची भेट घेतली व पहिल्या बेठकीत त्यांना आवाहन केले. "ब्रिटीशांना मी वारंवार सांगत आलो आहे की, सत्याला निर्भयपणे सामोरे जा आणि त्यानुसार वर्तन करा. योग्य तोडगा वापरा आणि त्यानंतर व ब्रिटीश परत गेल्यान्तर कितीही नुकसान झाले तरी त्याची पर्वा करुन नका."(४)

महात्मा गांधींनी फाळणी टाळण्याकरिता नऊ कलमी योजना व्हाइसरॉयनी सादर केली. सत्तांतरापूर्वी फाळणीचा प्रसंग व्हाइसरॉय माऊंटबॅटन यांनी टाळावा, अशी अपेक्षा गांधींची होती. गांधीजींच्या नऊ कलमी योजनेमधील तरतुदी पुढीलप्रमाणे :

१) मंत्रिमंडळ बनविण्याचा जीनाना पर्याय द्यावा.

२) कॅबिनेट मंत्रिमंडळ निवडण्यासाठी संपूर्ण जबाबदारी जीना यांच्याकडे सोपविण्यात यावी.

३) सर्व भारतीयांच्या हिताच्या कार्यक्रमासाठी, जीनांनी मान्य केले तर काँग्रेस जीनांना सर्व प्रकारचे सहकार्य करण्याची हमी देईल.

४) भारतीयांच्य हिताच्या कोणत्या गोष्टी आहेत कंवा नाहीत हे ठरविण्याचा एकमेव अधिकार लॉर्ड माऊंटबॅटन यांच्याकडे व्यक्तिगतदृष्टया राहील.

५) संपूर्ण भारतात शांतता राहावी यासाठी लीगचया वतीने किंवा जीना ज्या पदाचे सरकार बनवतील त्या सरकारच्या वतीने जीना शांततेसाठी प्रयत्न करतील.

६) या विशिष्ठ चौकटीमध्ये सत्तांतरापूर्वी पाकिस्तानची योजना संमतीसाठी पुढे ठेवप्याची जीना यांना मुभा मिळेल. आतापर्यंत पाकिस्तानच्या निमित्ताने सर्वांना खूप त्रास झाला आहे. त्यामुळे शस्त्र बळावर नव्हे तर युक्तिवादाच्या बळावर ते पाकिस्तानची योजना पसंतीसाठी पुढे मांडू शकतील. प्रांत किंवा अन्य प्रदेशावर या संदर्भात कोणतीही सक्त असणार नाही.

७) कायदे मंडळात काँग्रेस पक्षाच्या पाठीशी निर्णायक बहुमत आहे. परंतु त्या बहुमताचा उपयोग लीगच्या धोरणाविरुध्द काँग्रेस कदापित करणार नाही, याचे साधे कारण म्हणजे काँग्रेस व लीग यांनी एकत्र काम करावयाचे आहे. लीगने आखलेल्या कोणत्याही कार्यक्रमास काँग्रेसमधून हार्दिक पाठिंबा मिळेल. मात्र, संबंधित कार्यक्रम संपूर्ण भारताच्या हिताचा असला पाहिजे.

८) नॅशनल गार्ड किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाच्या खाजगी सेनेला देशात स्थान असता कामा नये.

९) जर जीनांनी हा प्रस्ताव मान्य केला नाही तर हीच योजना, पर्याय म्हणून काँग्रेसपुढे ठेवली जाईल.

गांधीजींची ही नऊ कलमी योजना व्हाईसरॉयना चांगली वाटली होती.(५) व्हाईसरॉयने गांधीजींना कळविले, "अनेक दृष्टीने तुमची योजना मला पसंत

आहे. परंतु माझा तिला पाठिंबा हवा असेल तर ही योजना अंमलात आणण्याची आपली तयारी आहे, असे अन्य नेत्यांनाही सांगितले पाहिजे." गांधीजींनी केलेल्या योजनेविषयी नोंदीत व्हाईसरॉय म्हणतात, गांधीजींची योजना अंमलात आणण्याच्या दृष्टीने एखादी कृती करण्यापूर्वी ती योजना नेहरुंना पसंत आहे, हे त्यांनी प्रथम पटवून दिली पाहिजे." यावर गांधीजींनी माऊंटबॅटन यांना कळविले, "काँग्रेसच्या सर्व नेत्यांना या योजनेची मी माहिती दिली असून त्यांनी सर्वांनी तिला पसंती दर्शविली आहे."(६) एका प्रमुख मुद्दयांबद्दल नेहरुंचा आक्षेप आहे, परंतु माऊंटबॅटन यांच्या दृष्टीने तो व्यवहार्य वाटत असेल तर त्याबाबत मी नंतर नेहरुंशी बोलेन, असे गांधीजींनी माऊंटबॅटन यांना कळविले.

माऊंटबॅटन त्यांच्या नोंदीत म्हणतात की, मौलाना आझाद व खान अब्दुल गफार खान यांच्याशी गांधीजींच्या योजनेबाबत चर्चा केली. आझाद म्हणाले की गांधीजींची योजना पूर्णपणे अंमलात आणता येण्याजोगी आहे. "काँग्रेसकडून योजनेचा स्वीकार होईल काय आणि ती व्यवहार्य आहे का?" असा प्रश्न व्हाइसरॉय यांनी खान अब्दुल गफार खान यांना केला. त्यांनी या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी दिले.(७)

माऊंटबॅटन म्हणतात, भारताचे ऐक्य राखणे हा गांधीजींचा मुख्य उद्देश आहे. अधिक एकोप्याने व एकत्रपणे काम करावयाचे असेल तर मुसलमानांच्या मनातील भीती काढून टाकली पाहिजे असे गांधीजींना प्रामाणिकपणे वाटते. ब्रिटीशांनी सरते शेवटी अदांड भारताला स्वातंत्र्य बहाल केले तर भारतीय जनता स्वतः सर्व प्रश्न समर्थपणे सोडवू शकेल. आवश्यक वाटले तर कोणत्या तरी स्वरुपात पाकिस्तानचीही ते स्थापना करु शकतील असे गांधीजींना निःसंशय वाटते.(८)

व्हाइसरॉयच्या नोंदीत आणखी पुढे म्हटले आहे की, गांधीजींना असे वाटते की हंगामी सरकारचा कारभार काँग्रेसच्या हाती सोपविण्यास जीना विरोध करतील. त्यामुळेच एकच मार्ग शिल्लक उरतो तो म्हणजे स्वतः

जीनांनी सरकार चालविण्याची जबाबदारी स्वीकारावी ही व्यवस्था स्वीकारण्यात गांधीजी कॉंग्रेसला भाग पाडू शकतील.(९)

देशाची फाळणी टाळण्याकरिता गांधीजींनी आखलेली योजना अगदी योग्य होती. परंतु ती प्रत्यक्षात उतरु शकली नाही. या योजनेला कॉंग्रेसने विरोध केला.

गांधीजी हे स्वातंत्र्य लढ्याचे सर्वसामान्य सेनापती होते. देशाच्या इतिहासातील अंतिम कसोटीच्या काळात गांधीजी योग्य मार्ग दाखवित होते. फाळणीपासून त्यांना परावृत्त करण्याचा गांधींनी प्रयत्न केला. गांधीजींच्या आयुष्याच्या अंतिम पर्वात कॉंग्रेसच्या नेत्यांनी गांधीजींना साथ दिली नाही.

पहिल्या महायुध्दानंतर लगेचच गांधीजींनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर ते कॉंग्रेसचे तीन दशके सर्वोच्च नेते होते. त्यांनी कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला आणि ताबडतोब पक्षात आमुलाग्र बदल घडवून आणला. ब्रिटीश सरकारविरुध्द केलेल्या सर्व लढ्यात कॉंग्रेसचे नेतेपद महात्मा गांधीजींच्याकडे होते. गांधीजी व पंडित नेहरु यांचे नाते अनेक वर्षापासून पिता-पुत्रांसारखे होते. गांधीजींनी तर अनेकदा जाहीरपणे सांगितले होते की नेहरुंना मी माझा वारसदार मानतो.

"भारत छोडो" आंदोलनातील प्रदिर्घ तुरुंगवासानंतर १९४५ मध्ये कॉंग्रेसच्या नेत्यांची सुटका झाली. त्यांच्या दृष्टिकोनात तेव्हा लक्षणीय बदल घडून आला. प्यारेलाल नमूद करतात, "हे नेते अक्षरशः रडले. आता पुन्हा नाही असे म्हणू लागले. तुरुंगाच्या त्या शेवटच्या अनुभवामुळे त्यांच्या दृष्टिकोनातच नव्हे तर राजकीय तत्त्वज्ञानात बदल झाला." रक्त, घाम, अश्रुंचा मार्ग स्वीकारण्यास फारच थोडेजण खऱ्या अर्थाने तयार होते. (१०)

१९४६ मध्ये हंगामी सरकार स्थापन झाले होते. अनेक उच्चपदस्थ कॉंग्रेस नेत्यांना सत्ता उपभोगावयास मिळाली. ह्याने सर्व चित्रच बदलले. ह्या नेत्यांच्या हातात शासन आले. कॉंग्रेस नेत्यांच्या ह्या बदलत्या वृत्तींवर जयप्रकाश नारायण समाजवादी कॉंग्रेसचे नेते यांनी एक टिप्पणी तयार केली

होती. त्या स्थितीचा उल्लेख करुन एक लेखक लिहितात, "फाळणीची घटना टळावी म्हणून आपल्या पाठीशी असलेल्या जनतेच्या प्रचंड पाठिंब्याच्या जोरावर काँग्रेसने देशव्यापी आंदोलन करावे, अशी माझी इच्छा आहे. तथापि काँग्रेसची नेते सत्ता हस्तगत करण्यासाठी कमालीचे आतुरलेले दिसत आहेत. अनेक वर्षे लढा दिल्यामुळे पुन्हा आंदोलन सुरु करण्यास ते कंटाळले आहेत." काँग्रेसच्या नेत्यांना इशारा देताना ते लिहितात, "काँग्रेस संघटनेचे रुपांतर केवळ एका संसदीय संस्थेमध्ये करण्याचा जर प्रयत्न झाला. लोकांच्या सेवेसाठी किंवा राज्यकारभारासाठी निव्वळ नोकरशाहीवर अवलंबून राहिले. देणग्या देवून काँग्रेस संघटनेची सुत्रे सांभाळण्याचा प्रयत्न झाला, तर समाजवादी काँग्रेसला अपरिहार्यपणे काँग्रेसशी संघर्ष करावा लागेल.(११)

देश अखंड राहावा, त्यादृष्टीने प्रयत्न करावी अशी काँग्रेस नेत्यांच्या मनात इच्छाच उरली नव्हती. देशाच्या एकात्मतेसाठी पुन्हा एकदा हाल अपेष्टा सोसण्याची त्यांनी तयारी नव्हती. स्वातंत्र्य लढ्यातील पराक्रमी वीरांचे पाय आता लटपटू लागले होते. गांधीजींनी ऐष आरामी जीवनातील धोके नजरेस आणून दिले होते. परंतु त्याकडे या वीरांनी दुर्लक्ष केल्याचे दिसते.

माऊंटबॅटन चरित्रकार लिहितात, "नेहरुंशी प्रत्यक्ष बोलणे झाल्यानंतर गांधीजी आणि त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांतील वाढत्या मतभेदांची व्हाईसरॉयना कल्पना आली. देश एकसंघ राहावा यादृष्टिने व्हाईसरॉयना भारतीय नेत्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करावयाचा होता. परंतु त्यात यश आले नाही. तर ते फाळणीसाठी त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करणार होते. गांधीजींचा फाळणीला कडवा विरोध होता त्यामुळे व्हाईसरॉयच्या मार्गात फार मोठा अडथळा निर्माण होण्याची शक्यता होती. परिणामत: काँग्रेसच्या नेत्यांमध्ये आणि गांधीजी यांच्यामध्ये फूट पाडणे आणि भारताची फाळणी स्वीकारण्यास नेत्यांना राजी करणे येवढा एकच उपाय त्यांना उपयुक्त वाटत होता." व्हाईसरॉय शेवटी या निष्कर्षाप्रत आले होते की, "गांधीजींच्या विरुध्द उभे राहण्याचे सामर्थ्य एकटया नेहरुंमध्येच आहे. माऊंटबॅटन यांनी शेवटी याच

मार्गाचा स्वीकार करुन नेहरुंना आपल्या बाजूला वळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला." (१२) व्हाईसरॉयचे हे डावपेच यशस्वी झाले. परंतु त्याचे पर्यवसन एका महाभयंकर शोकांतिकेत झाले.

काँग्रेसच्या पाठिंब्याने जीनांनी सरकार स्थापन करावे. त्यामुळे ब्रिटीशांचा फाळणीचा डाव उधळून टाकता येईल अशी गांधीजींची योजना होती. गांधीजींनी ती योजना व्हाईसरॉयपुढे चर्चेसाठी ठेवली होती. व्हाइसरॉयच्या सल्लागारांनी व्हाइसरॉय यांना सल्ला दिली की, गांधीजींच्या योजनेला फारसे महत्त्व देवू नका. व्हाइसरॉय यांनी जर गांधीजींच्या योजनेला फार महत्त्व दिले तर ब्रिटीश सरकारला ते परवडण्यासारखे नव्हते. याविषयी गांधीजींचे चिटणीस प्यारेलाल यांनी देशाच्या फाळणीनंतर होणाऱ्या अभूतपूर्व हानीची चांगलीच कल्पना गांधीजींना होती. त्यामुळे काँग्रेसच्या नेत्यांच्या हातून घडणाऱ्या चुकीपासून त्यांना परावृत्त करण्याचा गांधीजींनी अनेक प्रकारे प्रयत्न केले. ब्रिटीश गेल्यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीबाबत त्यांच्यावर खापर फोडण्यासाठी काँग्रेसने समर्थपणे आव्हानांना तोंड दिले पाहिजे असे गांधीजीना वाटत होते.

फाळणीसंबंधीच्या ब्रिटीशांच्या तर्कशास्त्रालाच गांधींचा विरोध होता. ब्रिटीशांनी फाळणीची सूचना करावी हे त्यांच्या निराशेचे चिन्ह आहे, असे गांधींना वाटत होते. म्हणून आपण व्हाइसरॉयला सादर केलेल्या योजनेच्या आराखडयाचा काँग्रेस नेत्यांनी स्वीकार करावा आणि त्यामुळेच फाळणीचे संकट टळेल, असे गांधीचे प्रयत्न होते. फाळणीमुळे त्यांच्या कोणत्याही अडचणी तर समाप्त होणार नाहीतच, परंतु आणखी नवीन अडचणी निर्माण करण्यास संबंधितांना जास्तच उत्तेजन मिळेल याबद्दल गांधींच्या मनात मुळीच संदेह नव्हता.

समाजवादी नेते राम मनोहर लोहिया आपल्या गिल्टी मॅन ऑफ इंडियाज पार्टीशन या पुस्तकात लिहितात. त्या काळात काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीला त्यांना खास निमंत्रित म्हणून मुद्दाम बोलाविण्यात येत असे. त्यांच्या

मते, "गांधीजींच्या योजनेमध्ये भारतातून ब्रिटीश निघून गेल्यानंतर जीनांच्या नेतृत्वाखाली पूर्णतः मुस्लिम लीगचे सरकार केंद्रात स्थापन करण्याची तरतूद होती. कायदेमंडळात काँग्रेसने या सरकारला पाठिंबा द्यावा आणि अशी योजना प्रत्यक्ष साकारली तर फाळणीच्या प्रश्नांवर जीना आणि मुस्लिम लीगमधील कडवेपणा कमी होईल अशा प्रकारची योजना खरोखरच अंमलात आली, तर देशाचे अखंडत्त्व कायम राहील आणि अयशस्वी ठरली तरी देशाची कोणत्याही प्रकारे हानी होणार नाही. परंतु या योजनेकडे काँग्रेस नेत्यांनी फारशा गांभीर्याने पाहिलेच नाही. राष्ट्रीयदृष्टया कमी महत्त्वाच्या प्रश्नांचीच ते चिंता करीत होते."(१३)

गांधीजींच्या योजनेला सरकारमध्ये सामील झालेल्या काँग्रेसच्या नेत्यांकडून पाठिंबा मिळाला नाही याचे एक साधे कारण, सर्व कारभार स्वतःच्या मतानुसार होत असल्याचे पाहण्यास ते आतूर होते. प्रदीर्घ कालावधीनंतर हाती आलेली सत्ता व अधिकार जीनांच्या हाती सोपविण्याची कल्पना त्यांना मुळीच रुचणारी नव्हती. फाळणीचे वर्णन माऊंटबॅटन अतिशय महान शोकांतिका असे करीत आणि त्यामुळे ही फाळणी टाळण्यासाठी गांधीजींच्या योजनेचा पाठपुरावा करुन काँग्रेस नेत्यांनाही तसे करण्यास राजी करण्याचे माऊंटबॅटन यांचे काहीच नुकसान होणार नव्हते.

गांधीजी दृढनिश्चयी होते. इंग्रजांच्या हातून होणाऱ्या देशाच्या फाळणीचा त्यांचा तीव्र विरोध होता. अगदी जवळ येऊ पाहात असलेल्या संकटांची कल्पना असूनही आपलेच सहकारी आपल्यापासून दुरावले आहेत. एवढेच नव्हे तर काँग्रेसचे नेतेही त्याचे समर्थन करीत आहेत. हे लक्षात आल्यानंतर गांधीजींनी फाळणी शेवटचा प्रयत्न केला. त्यांनी ब्रिटीशांच्या सद्सद्विवेकबुध्दीलाच आव्हान करण्याचा निर्णय घेतला. व्हाइसरॉयला पाठविलेल्या पत्रात गांधीजी म्हणतात, कोणीही उलटपुलट काही सांगितले तरी एक गोष्ट मात्र तेवढीच खरी आहे. भारताच्या फाळणीला लावलेला हातभार ही ब्रिटीशांच्या दृष्टिने फार मोठी घोडचूक ठरणार आहे. गांधीजींच्या मते फाळणीचा निर्णय हा एक

सापळा आहे आणि ब्रिटीश सरकारचा प्रतिनिधी म्हणून तुम्ही या सापळयात सापडू नका. कारण तो निर्णय खरोखरच अतिशय चुकीचा आहे. अत्यंत दु:खद अंत:करणाने ब्रिटीशांना गांधीजींनी आवाहन केले की आतापर्यंत भारताच्या हिताविरुध्द अनेक एकतर्फी निर्णय ब्रिटीशांनी घेतले आहेत. निदान आता अंतिम क्षणी तरी ब्रिटीशांचे ऱ्हदयपरिवर्तन व्हावे आणि त्यांनी भारताला हितावह होईल असा निर्णय घ्यावा.(१४)

महात्मा गांधींविषयी हिंदूत्त्ववाद्यांना द्वेष होता व आहे. तो एखाद्या व्यक्तिद्वेषासारखा नाही. गांधींच्या विचारान हिंदूत्त्ववाद्यांच्या विचाराला रोखले आणि त्यांच्या राजकारणाला पायबंद बसला म्हणून गांधींविषयी द्वेष होता. हिंदुत्त्ववाद्यांच्या मते, राजाजी योजनेला गांधींनी पाठिंबा दिला यामुळे फाळणी घडून आली हे मत चुकीचे आहे. महात्मा गांधींनी राजाजी योजनेला पाठिंबा दिला होता. त्या योजनेत सरळ फाळणी हे तत्त्व अभिप्रेत नव्हते. त्यात बरेच जर-तर चा समावेश होता. त्यामुळे राजाजी योजना काय होती ते समजून घेऊ.

**राजाजी योजना -**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्यात समन्वय व सहचर्य निर्माण करण्यासाठी मार्च १९४४ मध्ये एक योजना तयार केली. त्या योजनेच्या आधारे गांधीजींनी बॅ. जीनांना पत्रव्यवहार केला. सप्टेंबर १९४४ मध्ये गांधी व जीना यांची भेट होऊन त्या भेटीत राजाजी योजनेवर चर्चा करण्यात आली. राजाजी योजनेत खालील महत्त्वाच्या शिफारशींचा उल्लेख होतो.

अ) स्वतंत्र भारताच्या घटनेबाबत पुढे नमूद केलेल्या अटी मान्य झाल्या हिंदी स्वातंत्र्यांच्या मागणीला मुस्लिम लीग मान्यता देईल आणि संक्रमण काळात हंगामी सरकार स्थापण्यासाठी काँग्रेसशी सहकार्य करील.

ब) युध्द समाप्तीनंतर वायव्य व ईशान्य भारतातील मुसिलम बहुसंख्येच्या सलग जिल्हयाची फेररचना करण्यासाठी एक समिती नेमण्यात येईल. याप्रकारे

पुनर्रचित अशा विभागत प्रौढ मतदानाने वा इतर व्यवहार्य रीतीने सार्वमत घेऊन हिंदुस्तानातून फुटून निघण्याबाबत निर्णय घेतला जाईल. बहुमताने स्वतंत्र सार्वभौम राज्य स्थापन करण्याचे ठरले तर सीमेवरील जिल्हयांस दौनपैकी कोणत्या राज्यात सामील व्हायचे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य राहील.

क) सार्वमत घेण्यापूर्वी सर्व प्रश्नांनी आपली भूमिका मांडता येईल.

ड) अलग होण्याचे ठरले तर संरक्षण, व्यापार, दळणवळण व इतर आवश्यक बाबतीत दोन्ही राष्ट्रांत करार होतील.

इ) लोकसंख्येची अदलाबदल त्या त्या लोकांवर अवलंबून राहील.

ई) ब्रिटीश सरकार संपूर्ण स्वातंत्र्य देणार असेल व हिंदुस्थानच्या कारभाराची जबाबदारी संक्रमित करणार असेल तरच या सर्व अटी बंधनकारक राहतील.

ही योजना राजगोपालाचारी यांनी जीनांना तारेने पाठविली होती. गांधीजींनी या योजनेला पाठिंबा असल्याचे तारेने कळविले. गांधी व जीना यांच्यात या योजनेविषयी चर्चा झाली. त्यावेळी जीनांनी ही योजना मान्य नसल्याचे राजाजींना कळविले.(१५)

राजाजी योजनेमुळे आजच्यासारखी फाळणी होणार असती तर जीनांनी ही योजना फेटाळून लावण्याचे काहीच कारण नव्हते. मुस्लिम लीगच्या कार्यकारिणीपुढे जीनांनी ३० जुलै रोजी राजाजींची योजना ठेवली. या कार्यकारिणीच्या बैठकीत जीना म्हणाले की, गांधींनी निःसंदिग्ध शब्दात पाकिस्तानची मागणी मान्य करावी आणि लीगशी हातमिळवणी करावी. म्हणजे हिंदी लोकांचे स्वातंत्र्य मिळणार नाही. राजाजी योजना म्हणजे लुळेपांगळे कुरतडलेले पाकिस्तान असून गांधी कुरतडलेले पाकिस्तान देऊ पाहत आहेत. ही योजना मांडून गांधी व राजाजी घोडयापुढे गाडी जोडीत आहेत. ब्रिटीशांनी सत्तांतर केले तरच या योजनेची अंमलबजावणी होऊ शकणार आहे. त्यामुळे ही योजना मुस्लिम लीगला स्वीकारता येणे शक्य नाही.(१६) म्हणजे गांधींनी पाठिंबा दिलेल्या या राजाजी योजनेला जीनांनी सरळ सरळ धुडकावून लागले.

त्यामुळे हिंदुत्त्ववाद्यांच्या दावा निराधार आहे हे समजते. फाळणी टाळण्यासाठी गांधी स्वत: जी नऊ कलमी योजना मांडली ती ही जीनांना अमान्य होती. या दोन घटना गांधी फाळणीसाठी जबाबदार नव्हते हे स्पष्ट होते.

गांधीजींनी फाळणीसाठी निकराचा विरोध केला होता. त्यांना फाळणीविषयी घृणा वाटत होती. भारताच्या फाळणीची कल्पनासुध्दा त्यांच्या अंगावर शहारे आणत होती. परंतु त्याबाबतीत ते एकटे पडले होते. फाळणीसंबंधी ते जीनांना म्हणत, भारतापासून काही भाग काढून घेऊन त्याचे पाकिस्तान बनविण्याचे स्वप्न कशाला पाहता? सारा भारत हेच पाकिस्तान आहे असे समजून त्याचा कारभार करा. तुम्ही पंतप्रधान बना. संपूर्ण मंत्रिमंडळ मुस्लिम लीगचे बनवा. कसेही मंत्रिमंडळ बनवा पण पाकिस्तानची मागणी सोडून द्या असे गांधींचे मत होते.(१७)

गांधीजींनी जीनांना सतत भेटायला जाण्यास सरदार पटेल यांचा तीव्र विरोध होता. पटेलांच्या मते, गांधीजी जीनांना वारंवार भेटावयास गेल्यामुळे बॅ. महंमद अली जीनांची प्रतिष्ठा विनाकारण वाढते असे त्यांचे मत होते. पंरतु गांधीजी सरदार पटेलांना म्हणाले की, एकदाच नव्हे तर मी आवश्यकता भासल्यास हजार वेळा जीनांना भेटावयास तयार आहे. त्यांच्या मते, विनयानं कधीच नुकसान होत नाही, त्यामुळे केवळ लाभच होऊ शकतो. जीनांकडे गेल्यामुळे आपले काही नुकसान झालं असंही त्यांना वाटत नाही. उलट त्यामुळे राजकीय लाभासाठी हिंसेचा त्याग करायला पाहिजे हे जीनांना कळेल असे गांधींना वाटते.(१८)

जीनांच्या पाकिस्तान मागणीच्या निवेदनांवर गांधीजी ७ मे च्या प्रार्थना प्रवचनात म्हणाले, "पाकिस्तान ज्यांना हवा आहे त्यांना मी हात जोडून विचारतो की पाकिस्तान झाल्यामुळे भारताचा लाभ कसा होईल ते त्यांनी मला समजावून सांगावं. त्यांनी आपली बाजू जनतेसमोर मांडावी आणि पाकिसतान जनतेसाठी लाभदायक कसं होईल ते त्यांनी जनतेला पटवून द्यावे, तसे जर

झालं तर उत्तम! परंतु त्यांनी हे लक्षात ठेवावं की बळजबरीने एक तसूभरही पाकिस्तान मिळणार नाही." (१९)

फाळणीचा प्रश्न इतका गंभीर होत चालला होता, की फाळणी टाळणे कोणाही एकटया नेत्यासाठी ते शक्य नव्हते. महात्मा गांधी फाळणी टाळण्यासाठी शेवटपर्यंत ठाम राहिले. पंरतु फाळणीच्या प्रश्नांवर गांधीजींनी शेवटी शरणागती पत्करली. हा प्रश्न खरोखरच सोपा नाही. प्यारेला यांनी लास्ट फेज या आपल्या ग्रंथामध्ये त्या प्रश्नाला गांधीजींना दिलेले उत्तर उद्कृत केले आहे. गांधीजींनी आपल्या एका सहकाऱ्याला पत्र लिहून कळविले, पाकिस्तानच्या निर्मितीचा निर्णय अर्थातच चुकीचा आहे. परंतु त्या प्रश्नांवर मी कोणाशी आणि किती लढाई करु? या संदर्भात विवेचन करताना प्यारेलाल लिहितात, "गांधीजी स्वतःच्या सहकाऱ्यांविरुध्द असहकार पुकारु शकत नव्हते. कारण फाळणीच्या प्रश्नांवर त्यांच्या स्वतःच्या आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा मूल्यमापनात खूपच अंतर होते किंवा आपले सहकारी आपल्या बाजूने उभे राहण्यास तयार नाहीत. कदाचित ते आपली योजना उधळून लावतील असे त्यांना वाटले असावे.... ह्या काळात आपल्या सहकाऱ्यांवर ते नियंत्रण ठेवू शकले नव्हते, परंतु त्यांच्यातील मैत्रीचा धागा कायम होता." (२०)

गांधीजींनी भारताचे अखंडत्व कायम ठेवण्यासाठी केलेले कार्य त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील कर्तृत्त्वाएवढेच आकर्षक व नेत्रदिपक आहे. त्यांना स्वतःसाठी काहीही मिळवायचे नव्हते. ते जगले ते भारतासाठी, परकीय जोखडांपासून मुक्त झलेला एकात्म भारत हे त्यांचे स्वप्न होते. भारताची फाळणी सुचविणाऱ्या सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स यांच्या प्रस्तावाला गांधीजींनी केवळ विरोधच केला नाही, तर पहिल्या बोटीने भारत सोडून इंग्लंडला तडक जावे असा परखड सल्लाही दिला. तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनासुध्दा त्याच स्वरुपाची जाणीव महात्माजींनी दिली होती. फाळणीला प्रखर विरोध करुन स्वतंत्र भारताची सुत्रे कोणत्याही भारतीय नेत्यांकडे तुम्ही द्या. आम्ही आमचे पाहून घेऊ असे स्पष्ट शबदात सुनावले होते. फाळणीला महात्मा

गांधीजींचा प्रखर विरोध आहे याची जाणीव तत्काजीन व्हाइसरॉय यांना होती. म्हणूनच माऊंटबॅटन यांनी इंग्लंडचे पंतप्रधान चर्चिल यांना महात्मा गांधी हाच फाळणीच्या मार्गात खरा अडसर आहे असे स्पष्ट लिहिले होते.(२१)

जातीयवादाच्या ज्वाला निष्पाप हिंदू-मुस्लिम भगिनींचे प्राण घेत असताना व त्यांची घरेदारे बेचिराख होत असताना ही अमानुष भयावह आग विझविण्यासाठी गांधीजी दिल्ली बाहेर होते. त्यावेळी त्यांच्या अनुपस्थितीचा अचूक फायदा उठवून माऊंटबॅटन यांनी फाळणीची योजना पंडित नेहरु, सरदार पटेल यांच्या गळी उतरवण्यात यश मिळविले आणि पंजाब व बंगालची फाळणी करुन त्यास सुरुवात करावी असा सल्ला दिला. पंडित नेहरु, आचार्य कृपलानी आगि मृदला साराभाई हा निर्णय सांगण्यासाठी जेव्हा गांधीजींकडे गेले तेव्हा गांधीजींनी त्यास मूळीच मान्यता दिली नाही. उलट ज्या आचार्य कृपलानींवर महात्माजींचा पूर्ण विश्वास होता त्यांना असा निर्णय घेण्यापूर्वी महात्माजींनी प्रथम सल्लामसलत करावी असे तुम्हाससुध्दा कसे वाटले नाही? असे दु:खोद्गार काढून त्यांना परत रवाना केले.(२२)

महात्मा गांधींनी भारताची फाळणी टाळण्यासाठी निकराचा विरोध केला होता. गांधीमुळे फाळणी झाली नाही हे देशाला समजून चुकले आहे. गांधीजींचा राजकारणाचा काळ हा अगदी काल परवाचा काळ आहे. गांधींनी पाहिलेली, त्यांच्या सहवासात राहिलेली व त्यांच्या राजकारणात असलेली काही माणसे आज हयात आहेत. इतक्या डोळयादेखत गांधींचे राजकारण असताना फाळणीला महात्मा गांधी कारणीभूत आहेत किंवा त्यांच्यामुळे फाळणी घडून आली असे म्हणणे हे राजकारणांविषयी अज्ञान दिसून येते. फाळणीची बीजे त्यावेळी रुजली त्यावेळी मोहनदास करमचंद गांधी नावाचा माणूस भारतात आहे याविषयी कोणाला माहिती नव्हती. १८८८ च्या सुमारास लॉर्ड डफरीने याने फाळणीची बीजे रुजवली. १९०९ साली विभक्त मतदारसंघांची स्थापना झाली. त्यावेळी या बीजांना कोंब फुटले होते. गांधींनी फाळणीचा विषारी वेल मुळापासून उपटून टाकण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांत ते यशस्वी झाले

नाहीत ते एकाकी पडले होते. फाळणी रोखण्याचे सामर्थ्य जर देशात त्यावेळी कोणामध्ये असेल तर ते फक्त एकटया महात्मा गांधींच्या मध्येच होते. फाळणीसाठी गांधी कारणीभूत नाहीत तर त्यांचा दोष संपूर्ण देशावर येतो! फाळणीला प्रतिकार करण्यासाठी देश सिध्द आहे असे गांधींना दिसले असते तर गांधींनी फाळणी निश्चितच टाळली असती. फाळणीच्या विरोधात फक्त गांधीच शेवटपर्यंत उभे राहिले होते असे दिसून येते.

# संदर्भसूची

१ गांधी (मोहनदास करमचंद) - गांधी विचार दर्शन - जातीय ऐक्य : खंड १०, पुणे महाराष्ट्र गांधी स्मारक भवन, १९९५, पृष्ठ क्र. २१ .

२ Pyarelal - Mahatma Gandhi - The Last Phase, Navjeevan Publishing House, Ahmedabad, 1958, Vol. II, p. 195.

३ Capbell Jonson, Allan - Mission with Mountbatton, Robert Hail, London, 1951, p. 86-87.

४ पूर्वोक्त... ८७

५ फडणीस जगन - महात्म्याची अखेर - मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, १९९४, पृ. १५-१६.

६ पत्र दि. ०५/०४/१९४७ Pyarelal - Mahatma Gandhi - The Last Phase, Navjeevan Publishing House, Ahmedabad, 1958, Vol. II, p. 449.

७ देवचंद्र झा. - महात्मा गांधी : काँग्रेस आणि भारताची फाळणी (अनुवादक - सराफ व एकनाथ बागुल), विद्या प्रकाशन, पुणे १९९८ पृ. ६२-६८.

८ पूर्वोक्त ... ६५

९ पूर्वोक्त ... ६८

१० लॅरी कॉलिन्स् - फ्रिडम ॲट मिडनाईट, (अनुवाद - व्होरा राजेंद्र) मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर १९९४, प्रकरण - ५, पृष्ठ ११२.

११ लोहिया राममनोहर : भारतीय फाळणीचे गुन्हेगार (अुनवाद : श्रीपाद कळेकर) पुणे प्रेस्टिज प्रकाशन, १९६८, पृ. ६२.

१२ अमूली गांगुली द्वारा उधृत : टाईम्स ऑफ इंडिया, ११-०४-१९९४.

१३ लोहिया डॉ. राम मनोहर : फाळणीचे गुन्हेगार (अनुवाद, श्रीपाद केळकर) पुणे प्रेस्टिज प्रकाशन, १९६८, पृ. ७६.

१४ Nanda B. R. : Gandhi and India's Partition, Vision Books Pvt. Ltd., 2001, p.148.

१५ फडणीस जगन - महात्म्याची अखेर - मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, १९९४, पृ. १६-१७.

१६ पूर्वोक्त ... १७.

१७ Tendulkar D. G. : Mahatma (Vol. 7), Govt. of India Publication, New Delhi, p. 347.

१८ देवचंद्र झा. - महात्मा गांधी : काँग्रेस आणि भारताची फाळणी (अनुवादक - सराफ व एकनाथ बागुल), विद्या प्रकाशन, पुणे १९९८ पृ. १९५.

१९ फिशर लुई - गांधी की जीवन कहानी, सुलभ साहित्य मंडल, दिल्ली, २००१, पृ. १२४.

२० Pyarelal - Mahatma Gandhi, vol. II, Chapter Four, Navjeevan Publishing House, Ahmedabad, 1958, Vol. II, p. 395.

२१ Nanda B. R. : Mahatma Gandhi - A Biography, Allied Publisher, Bombay, 1968, p. 411.

२२ Kriplani J. B. – Gandhi – His Life and Thought, 1947, p.284.